व


नाव - आदिती राजू जगदाळे

पत्ता - मु.पो नांदगिरी (घुमाळवाडी)
ता. कोरेगाव, जि. सातारा ४१५०१०

ईमेल आयडी - Aditijagdale012@gmail.com

मोबाईल क्रमांक - 9359688591

Class - T.Y. Mechanical


महाविद्यालयाचे नाव -
कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग सातारा.

महाविद्यालयाचा पत्ता -
CTS No: 453, सदर बझार सातारा
महाराष्ट्र 415001

# भारतीय संविधान निर्मितीची प्रक्रिया

"स्वातंत्र्याची पहाट आली
गुलामीतून मुक्तता झाली
संविधानाने दिले अस्तित्व
हक्क - कर्तव्यांची जाण झाली!"

भारताचे संविधान (भारताची राज्यघटना) हा भारताचा सर्वोच्च कायदा व पायाभूत कायदा आहे. भारतीय संविधानावर विविध पाश्चात्त्य संविधानाचा प्रभाव आहे. राज्यघटना इंग्रजी भाषेत असून तिची हिंदी भाषेतील प्रतही कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटनेचा स्वीकार केला गेला. व इ.स. २६ जानेवारी १९५० पासून भारताची राज्यघटना अंमलात आली. त्यानंतर भारत देश हा एक 'प्रजासत्ताक राष्ट्र' म्हणून अस्तित्वात आले. त्यामुळे या दिवसाचे महत्त्व लक्षात घेऊन '२६ नोव्हेंबर' हा संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या संविधानाचे शिल्पकार आहेत. देशाच्या कारभारासंबंधीच्या तरतुदी एकत्रितपणे व सुसूत्रपणे संविधानामध्ये नमूद केलेल्या आहेत. संविधान हे देशाच्या राज्यकारभारात संबंधीच्या तरतुदींचा लिखित असा दस्तऐवज आहे.

१९३४ मध्ये भारतासाठी संविधान सभेची कल्पना सर्वप्रथम मांडण्याचे श्रेय साम्यवादी नेते मानवेंद्रनाथ रॉय यांना दिले जाते. त्यापूर्वी भारतमंत्री बर्कन हेड यांच्या आवाहनानुसार भारतीय नेत्यांनी नेहरू रिपोर्टच्या स्वरूपात १९२८ मध्ये घटनेबाबतच्या शिफारशी देण्यात आल्या होत्या. गोलमेज परिषदेतही घटना निर्मितीबाबत काँग्रेसने आग्रह धरला. ३० मार्च १९४२ रोजी क्रिप्स योजना जाहीर झाली. त्यानुसार महायुद्ध समाप्तीनंतर भारतासाठी एक घटना परिषद नेमण्याचे आश्वासन देण्यात आले. व १९४६ च्या कॅबिनेट मिशन (त्रिमंत्री योजने) नुसार घटना समितीच्या निर्मितीची तरतूद करण्यात आली. तत्कालीन ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंड ॲटली यांनी कॅबिनेट मिशन योजना जाहीर केली. मार्च १९४६ मध्ये याचा स्थापनेचा

निर्णय घेण्यात आला. मे १९४६ मध्ये कॅबिनेट मिशन भारतात आले आणि त्याच महिन्यात त्यांनी आपल्या शिफारसी सरकारला सादर केल्या. तत्कालीन भारतमंत्री सर पॅथीक लॉरेन्स, स्टॅफर्ड क्रिप्स आणि अल्बर्ट अलेक्झांडर यांचा समावेश कॅबिनेट मिशन मध्ये होता.

त्रिमंत्री योजनेनुसार संविधान सभेची रचना ठरविण्यात आली. संविधान सभेत एकुण सदस्य ३८९ होते. यापैकी २९२ सदस्य ब्रिटिश प्रांतातून निवडून दिले जातील. ४ चीफ ब्रिटिश कमिशनर प्रांताकडून निवडून दिले जातील असे ठरविण्यात आले. संस्थानिकांसाठी ९३ जागा राखीव ठेवण्यात आल्या. त्यांची नियुक्ती करण्याचे सर्वाधिकार संस्थानिकांना बहाल करण्यात आले. कॅबिनेट मिशनचा शिफारशीनुसार जुलै-ऑगस्ट १९४६ साली घटना समितीसाठी २९६ सदस्यांची निवड करण्यासाठी प्रांतीय विधि-मंडळाच्या माध्यमातून अप्रत्यक्ष पद्धतीने निवडणूक घेण्यात आल्या. १० लाख लोकांमागे एक अशा प्रमाणात प्रतिनिधींची निवड करण्यात येऊन घटना परिषदेची निर्मिती झाली. या परिषदेमध्ये सर्वसामान्य २१०, मुस्लीम ७८, शीख ४ व इतर ४ अशा २९६ प्रतिनिधींची निवड करण्यात आली. १९४६ मध्ये २९६ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला २०८ जागा मिळाल्या. मुस्लीम लीग ७३, अपक्ष ८ व इतरांना ८ जागा मिळाल्या. मात्र यानंतर मुस्लिम लीगने घटना समितीमध्ये सहभाग न घेण्याचा निर्णय घेतला होता.

९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची स्थापना झाली व पहिली बैठक भरली. घटना समितीचे हंगामी अध्यक्ष म्हणून डॉ. सच्चिदानंद सिन्हा निवडले गेले. हे संविधान सभेतील सर्वात ज्येष्ठ सदस्य होते. हंगामी अध्यक्षपदी सर्वात ज्येष्ठ सदस्यांची नियुक्त करण्याची पद्धत भारताने फ्रान्सकडून स्वीकारली. तर हंगामी उपाध्यक्ष म्हणून फ्रँक ॲंथोनी यांची निवड करण्यात आली. सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली ११ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीची दुसरी बैठक भरली. यात कायमस्वरूपी अध्यक्षपदी डॉ. राजेंद्रप्रसाद यांची निवड झाली. घटना समितीचे उपाध्यक्ष म्हणून डॉ. एच.सी. मुखर्जी यांची तर समितीचे कायदेविषयक सल्लागार म्हणून बेनेगल नरसिंह राव यांची निवड झाली. यावेळी घटना समितीचे वार्ताकर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे होते. घटना निर्मितीसाठी एकुण 22 समित्या व उपसमित्यांची स्थापना करण्यात

आली. संविधानसभेत ज्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली त्यांपैकी काही व्यक्ती व त्यांच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे - १) डॉ. सच्चिदानंद सिन्हा - हंगामी अध्यक्ष, घटना समिती २) डॉ. राजेंद्र प्रसाद - अध्यक्ष, घटना समिती व सुकाणू समिती ३) हरेंद्रकुमार मुखर्जी - उपाध्यक्ष, घटना समिती व सुकाणू समिती ४) बी. एन. राऊ - कायदेशीर सल्लागार, घटना समिती ५) पंडीत नेहरू - अध्यक्ष, केंद्र अधिकार समिती ६) सरदार पटेल - अध्यक्ष, राज्य अधिकार समिती ७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - अध्यक्ष, मसुदा समिती 3 जून १९४७ रोजी माउंटबॅटन प्लॅन नुसार भारताची फाळणी जाहीर करण्यात आली. यामुळे पश्चिम बंगाल, सिंध, बलुचिस्तान, वायव्य सरहद प्रांत, पूर्व बंगाल व आसाम मधील सिल्हेट जिल्हा मिळून पाकिस्तानची निर्मिती करण्यात आली. या भागातील घटना समितीतील सदस्यांची संख्या कमी करण्यात आली. तसेच उर्वरित भारतातील मुस्लिम लीगच्या सदस्यांनी घटना निर्मितीत सहभाग घेतला. ३१ ऑक्टोबर १९४७ रोजी घटना समितीची पुर्नरचना करून त्याची एकूण सभासद संख्या २९९ इतकी करण्यात आली. घटना समितीत एकूण १५ महिला सदस्यांचा समावेश होता. घटना समितीत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींची 33 सदस्य संख्या होती.

"समता, बंधुता, न्याय समानता,
लोकहिताचा सर्वस्वी विचार,
समता आणि स्वातंत्र्याचे
संविधानाने दिले आम्हा अधिकार!"

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेप्रमाणे भारत हे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक आहे. उद्देशिका फ्रेंच राज्यक्रांतीच्या आदर्शांना अनुसरून नागरिकांस सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय तसेच आचार, विचार, धर्म, श्रद्धा यांचे स्वातंत्र्य आणि राजकीय समानता व समान संधी देण्याचे अभिवचन देते. मूळ उद्देशिकेत समाजवादी धर्मनिरपेक्ष व एकात्मता हे शब्द नव्हते. राज्यघटनेच्या ४२ व्या दुरुस्तीद्वारे ते उद्देशिकेत घालण्यात आले.

१३ डिसेंबर १९४६ रोजी पंडित नेहरू यांनी संविधान सभेत उद्देश पत्रिका मांडली. व २२ जानेवारी १९४७ रोजी संविधान सभेने

तिचा स्वीकार केला. भारतीय राज्यघटनेचा सरनामा / प्रास्ताविका उद्देशपत्रिकेवरूनच तयार करण्यात आला आहे. संविधान सभेला स्वतंत्र्य भारतासाठी घटनानिर्मिती करणे आणि देशासाठी कायदे-मंडळ म्हणून कार्य करणे ही दोन कार्ये देण्यात आली होती. कायदे मंडळ (तात्पुरती संसद) म्हणून कार्य करताना गणेश वासूदेव मावळणकर अध्यक्ष म्हणून कार्य करत असत. १७ नोव्हेंबर १९४७ रोजी त्यांची निवड करण्यात आली. घटना परिषदेमार्फत २९ ऑगस्ट १९४७ रोजी मसूदा समितीची निवड झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मसूदा समितीच्या अध्यक्ष-पदी निवड झाली. मसुदा समितीतील सदस्यांची नावे पुढील-प्रमाणे आहेत. १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - अध्यक्ष २) एन. गोपाल स्वामीअय्यंगार ३) अल्लादी कृष्णस्वामी अय्यर ४) सईद अहमद सादुल्लाह ५) डॉ. के. एम. मुन्शी ६) एन. माधव राव (बि. एल. मित्तल यांच्या राजीनाम्यानंतर) ७) टी. टी. कृष्णामाचारी (डी. पि. खेतान यांच्या मृत्युनंतर). फेब्रुवारी १९४८ साली मसुदा समितीने आपला अहवाल घटना समितीला सादर केला. या अहवालावर घटना समितीमध्ये तीन वाचन करण्यात आले.

१) प्रथम वाचन : ४ नोव्हेंबर १९४८ ते ९ नोव्हेंबर १९४८

२) द्वितीय वाचन: १५ नोव्हेंबर १९४८ ते १७ ऑक्टोबर १९४९

३) तृतीय वाचन: १४ नोव्हेंबर १९४९ ते २६ नोव्हेंबर १९४९

या वाचनादरम्यान भारतीय जनतेकडून ७३५३ सूचना व तक्रारी आल्या होत्या. त्यापैकी २४७३ तक्रारींचे घटनानिर्मितीसाठी निर्वाचन करण्यात आले. राज्यघटना निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे. म्हणून त्यांना भारतीय 'राज्यघटनेचे शिल्पकार' असे म्हणतात. भारतीय संविधान सभेची ११ सत्रे झाली. या दरम्यान संविधान सभेने १६६ दिवस काम केले. तर मसुदा समितीने ११४ दिवस मसुद्यावर काम केले. भारतीय संविधान तयार करताना जगातील विविध देशांच्या घटनेचा विचार करण्यात आला. विविध देशांच्या राज्यघटनांचा भारतीय राज्यघटनेवर पडलेला प्रभाव पुढीलप्रमाणे आहे.

१) संसदीय शासनपद्धती, कायदयाचे राज्य, संसद सदस्यांचे विशेषाधिकार - इंग्लंड

२) संघराज्यात्मक स्वरूप, शेषाधिकार - कॅनडा

३) उपराष्ट्रपतीपद, न्यायालयविषयक तरतुदी, मूलभूत हक्क- अमेरिका

३) मार्गदर्शक तत्त्वे, राष्ट्रपती निवडणूक पद्धत, राज्यसभेवरील नामनिर्देशित सदस्य - आयरलॅंड
५) समवर्ती सूची, आंतरराज्य व्यापारविषयक तरतुदी - ऑस्ट्रेलिया
६) गणराज्य, सरनाम्यातील स्वातंत्र्य, समता, बंधूता ही तत्त्वे - फ्रान्स
७) घटनादुरूस्ती - दक्षिण आफ्रिका
८) आणीबाणी - जर्मनी
९) समाजवाद, मूलभूत कर्तव्ये - रशिया

भारतीय राज्यघटनेवर १९३५ च्या भारतीय शासन कायदयाचा जास्त प्रमाणावर प्रभाव दिसून येतो.

भारताचे संविधान बनून तयार होत होते. पण संविधान हे हस्तलिखित असावे अशी नेहरूंची इच्छा होती. बिहारी नारायण रायजादा यांना कॅलिग्राफीची कला अवगत असल्याने याची जबाबदारी त्यांना देण्यात आली. त्यानंतर संविधान लिहिण्यासाठी त्यांना संविधान हॉलमधील एक खोली देखील देण्यात आली. संविधान लिहिण्यासाठी २५४ दौत आणि 303 पेन वापरण्यात आले. त्यांना संविधान लिहिण्यासाठी ६ महिने लागले. या कामासाठी रायजादा यांना मानधन किती घेणार अशी विचारणा करण्यात आली तेव्हा त्यांनी ते घेण्यास नकार दिला. परंतु संविधानाच्या प्रत्येक पानावर त्यांचे नाव व शेवटच्या पानावर त्यांच्या आजोबांचे नाव असेल अशी अट ठेवली होती. आचार्य नंदलाल बोस यांच्या मार्गदर्शनाखाली शांतिनिकेतमधील कलाकारांनी भारतीय संविधानातील संपूर्ण हस्तकला पूर्ण केली. तसेच प्रास्ताविकाच्या व संविधानाच्या इतर पानांवरील नक्षीकाम व सजावट जबलपूरचे व्योहार राममनोहर सिन्हा यांनी बनवलेली आहे. ६४ लाख रूपये खर्च करून व २ वर्ष ११ महिने १८ दिवसाच्या कालावधीत घटना तयार करण्यात आली.

"जे हक्क पाहिजे ते सारेच दान करते,
रक्षा तुझी नि माझी हे संविधान करते.
आयुष्यमान करते कमजोर भारताला,
सुटताच तोल अमुचा सावधान करते.
सुर्यासमान आहे ही कायदा व्यवस्था,
अंधारल्या जगाला दैदिप्यमान करते..!"

भारतीय राज्यघटना हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. समता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय तसेच प्रज्ञा, शील, करुणा व मैत्री या मूल्यांची बीजे रोवून भारताच्या संविधानाची निर्मिती करण्यात आली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना स्वीकृत करण्यात आली. त्यावेळी घटनेत १ प्रास्ताविका, २२ भाग, ३९५ कलमे व ८ अनुसूचींचा (परिशिष्ट) समावेश होता. सध्या भारताच्या राज्यघटनेत १ प्रास्ताविका, २६ भाग, ४५२ कलमे व १२ परिशिष्टे आहेत. आतापर्यंत १०४ घटनादुरुस्त्या झाल्या आहेत.

22 जुलै १९४७ रोजी घटना समितीने भारताचा राष्ट्रध्वज स्वीकृत केला. त्याचे डिझाईन पिंगली वेंकय्या यांनी तयार केले. २४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीची शेवटची बैठक भरली होती. याच दिवशी भारताचे राजचिन्ह, राष्ट्रगीत व राष्ट्रगान स्वीकृत करण्यात आले. रविंद्रनाथ टागोरांच्या भारत भाग्य विधाता, या गीताला राष्ट्रगीताचा मान देण्यात आला. २४ जानेवारी १९५० याचदिवशी घटना समितीचे रुपांतर हंगामी संसदेत करण्यात आले. भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांची नियुक्ती करण्यात आली. २६ जानेवारी १९५० भारताचा प्रथम स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करण्यात आला. २६ जानेवारी १९५० पासून नवीन राज्यघटनेनुसार देशाचा कारभार सुरु झाला. म्हणून हा दिवस 'प्रजासत्ताक दिन' म्हणून सर्व देशभर साजरा केला जातो.

"संविधानाचे जाणूनी महत्व,
संविधानाचा राखूया सन्मान,
लोकहितवादी लोकशाहीला,
संविधानाचा असे अभिमान
चला राखूया - संविधानाची शान !!"